महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.)मुंबई

## (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

---

## नागरिकांची सनद

---

- ✓ सनद (Citizen Charter)
- ✓ नागरिकांची सनद
- ✓ प्रस्तावना .
- ✓ महामंडळाची रचना
- ✓ महामंडळाच्या योजना

# प्रस्तावना

## १) महामंडळाची स्थापना

महाराष्ट्र शासन समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक एमपीसी-१०८४/ १५४७/ (४०५) / एससीपी-०१ मंत्रालय विस्तार भवन , मुंबई ४०००३२, दिनांक **०६ मार्च , १९८५** नुसार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ भारतीय कंपनी कायदा, १९५६ खाली रू.२.५० कोटींच्या भागभांडवला सहीत नोंदणीकृत करण्यास मान्यता दिली आहे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची स्थापना **११ जुलै, १९८५** रोजी झालेली आहे.

## २) उद्देश

महाराष्ट्रामध्ये मागासवर्गीयांपैकी संख्येने मोठयाप्रमाणात असलेला मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीं यांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास होण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या कर्ज योजना राबवून त्यांना दारिद्रय रेषेच्यावर आणणे हा या महामंडळाच्या स्थापनेचा मुख्य उद्देश आहे.

१२ पोटजातीं पुढील प्रमाणे.

- मांग
- मदारी
- मातंग
- राधेमांग
- मिनी मादींग
- मांग गारूडी
- मादींग
- मांग गारोडी
- दानखणी मांग
- मादगी
- मांग महाशी
- मादिगा

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाची मुख्य उद्दिष्टे :-**

१. अनुसुचित जातीतील मातंग समाज व त्यातील 10 पोटजाती तसेच शासनाने नव्याने समाविष्ठ केलेल्या मादगी व मादिगा या पोटजाती अशा १२ **जातीतील** लाभार्थी/कुटूंबाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नतीसाठी आवश्यक व उपयुक्त असतील अशा व्यापक आर्थिक चळवळीला चालना देणे व त्यासाठी सहाय्य करणे, हा मुख्य उद्देश आहे.

२. तंतु कामाच्या व्यवसायात गुंतलेल्या मातंग समाजाला आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करुन देणे,

३. घायपाताचे निर्माते, संस्करणक, आयातक, निर्यातक, खरेदीदार, विक्रेते, संग्रही व वितरक आणि / किंवा घायपाताचे व्यापारी किंवा घायपातापासून बनविण्यांत येणा-या सर्व वस्तू यांचा व्यवसाय चालू ठेवणे.

४. मातंग समाजाच्या फायदयासाठी व कल्याणासाठी स्वत:च्या जबाबदारीवर किंवा शासन सांविधिक संस्था, कंपन्या, भागिदारी संस्था, व्यक्ती यांच्या सहयोगाने किंवा अशा संघटना, अभिकरणे यांच्यामार्फत कृषि विकास कार्यक्रम, कृषि उत्पादनांचे पणन, प्रक्रिया व त्यांचा पुरवठा आणि साठा,

लघुउद्योग, इमारत बांधकाम, वाहतूक आणि (वैद्यकीय अभियांत्रिक, वास्तुशास्त्र इत्यादींसारखा) इतर धंदा, व्यवसाय, व्यापार किंवा कार्यक्रम यांच्या माध्यमातून योजना आखणे, प्रचलन करणे, मदत करणे, सल्ला देणे, सहाय्य देणे, वित्तीय सहाय्य देणे, संरक्षण देणे आणि उपक्रम हाती घेणे.

५. आर्थिक स्थिती/ पध्दती आणि उत्पादन, निर्मिती व्यवस्थापन आणि पणन यांच्या तंत्रांचा विकास करण्यास आणि त्यात सुधारणा करण्यास, मातंग समाजाला समर्थ बनविण्यासाठी काम, धंदा, व्यवसाय, व्यापार किंवा कार्य चालू करण्यासाठी भांडवल, कर्ज मिळविण्याचे साधने, साधनसामुग्री आणि तांत्रिक व व्यवस्थापकीय सहाय्य देण्याची तरतूद करणे.

### ३) महामंडळाचे अधिकृत भागभांडवल

महामंडळ स्थापनेच्या वेळी मंजूर करण्यात आलेल्या अधिकृत भागभांडवलामध्ये शासनाने वेळोवेळी वाढ केली असून महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र. ४६ / महामंडळे/दिनांक ०८ जुन, २०२२ अन्वये महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रू. ३००.०० कोटीवरून रू. १००० कोटीपर्यंत वाढविण्यात आले आहे.

महामंडळास २०२३-२४ (३१-०७-२०२३) अखेर रू. ५५२.८४ कोटी भागभांडवल निधी प्राप्त झाला असून त्यामध्ये सन १९९०-९१ मध्ये केन्द्र शासनाकडून प्राप्त झालेल्या रू. ३३.९५ लाख रक्कमेचा समावेश आहे. महाराष्ट्र शासन व केन्द्र शासन यांचेकडून अनुक्रमे ५१:४९ टक्के प्रमाणात अधिकृत भागभांडवल विभागण्यात आलेले आहे.

## अधिकृत भागभांडवल वाढविण्यात आल्याचे शासन निर्णय

१. शासन निर्णय क्रमांक एमपीसी-१०८४/ १५४७/ (४०५) /एससीपी-०१ मंत्रालय विस्तार भवन , मुंबई ४०००३२, दिनांक ०६ जुन, १९८५ अनुसार **रू. २.५० कोटी** भागभांडवल निश्चित करण्यात आले.

२. शासन निर्णय क्र. एलएएस / १०९५ / प्र.क्र.११७ / विघयो/ दि.१७ नोव्हेंबर १९९५ नुसार महामंडळाचे अधिकृत भागभांडवल **रू.१०.०० कोटी** पर्यंत वाढविण्यात आले.

३. शासन निर्णय क्र. एलएएस २००१/ प्र.क्र.११५ / विघयो-२/ दि.३० मार्च २००२ नुसार महामंडळाचे अधिकृत भागभांडवल **रू.१२.५० कोटी** पर्यंत वाढविण्यात आले.

४. एमपीसी-२००२/ प्रक्र.१५८ / विघयो-२ / सा. न्या. विभाग, मुंबई / दिनांक १७ मार्च , २००४ अन्वये महामंडळाचे भागभांडवल **रू. ५०.०० कोटी** पर्यंत वाढविण्यात आलेले आहे.

५. शासन निर्णय क्र.एलएएस-२००६/प्र.क्र.१७९//विघयो-२/ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२ दिनांक २०, डिसेंबर २००६ नुसार सदर महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रक्कम **रू.७५.०० कोटी** पर्यंत वाढविण्यात आले आहे.

६. शासन निर्णय क्र. एलएएस-२०१२/प्र.क्र.४२२/महामंडळे/मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२ दिनांक २६, जून २०१३ नुसार या महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रक्कम **रू.३००.०० कोटी** पर्यंत वाढविण्यात आलेले आहे.

७. शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र. ४६/ महामंडळे/दिनांक ०८ जुन, २०२२ अन्वये महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रू. ३००.०० कोटीवरून रू. १००० कोटीपर्यंत वाढविण्यात आले आहे.

# महामंडळाची मंजूर पदांची रचना

शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक- एलएएस-2013/प्र.क्र.167/महामंडळे दिनांक 30 जुलै, 2013 अन्वये मंजूर पदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | पदनाम | ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | | मंजूर पदे | कार्यरत पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | वेतनबॅन्ड | ग्रेड वेतन | | |
| १. | व्यवस्थापकीय संचालक (प्रतिनियुक्तीवर) | ३७४००-६७००० | १००००/- | १ | १ |
| २. | महाव्यवस्थापक | १५६००-३९१०० | ६६००/- | २ | १ |
| ३. | व्यवस्थापक/ उपमहाव्यवस्थापक/ प्रादेशिक व्यवस्थापक | १५६००-३९१०० | ६६००/- | १२ | ११ |
| ४. | सहा.व्यवस्थापक/ सहाय्यक महाव्यवस्थापक/ जिल्हा व्यवस्थापक | ९३००-३४८०० | ४४००/- | ३३ | ३१ |
| ५. | लेखाधिकारी (प्रतिनियुक्तीवर) | ९३००-३४८०० | ४४००/- | १ | १ |
| ६. | सहाय्यक लेखाधिकारी (प्रतिनियुक्तीवर) | ९३००-३४८०० | ४३००/- | १ | १ |
| ७. | कार्यालयीन सहाय्यक | ५२००-२०२०० | २८००/- | ३७ | ३७ |
| ८. | लघुटंकलेखक | ५२००-२०२०० | २४००/- | १ | १ |
| ९. | लिपीक टंकलेखक | ५२००-२०२०० | १९००/- | ५९ | ५९ |
| १०. | वाहनचालक | ५२००-२०२०० | १९००/- | २ | २ |
| ११. | शिपाई | ४४४०-७४४० | १३००/- | २१ | २१ |
| | | | एकूण | १७० | १६६ |

**कार्यपूर्तीचे वेळापत्रक**

महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील प्रकरण क्र.3 चा कलम 11 मध्ये नमूद केलेल्या न्याय प्रविष्ठ बाबी लोक आयुक्त किंवा उपलोकआयुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था, आयोग, न्यायिकवत बाबी, केंद्र किंवा अन्य राज्य शासनाच्या संबंधातील प्रकरणे, विधि विभागाशी संबंधित बाबी, मंत्रीमंडळास सादर होणा-या मुख्य धोरणात्मक बाबी इत्यादींना कार्यपूर्तीच्या वेळापत्रकातील वेळापत्रकातून सुट राहील.

**(अ) गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण-**

कार्यपूर्तीस होणारा विलंब व अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी परिच्छेद- 5 मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासून 7 दिवसात त्यांची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहिल. याउपरही नागरिकांचे समाधान न झाल्यास मा.व्यवस्थापकीय संचालक, सा.लो.अ.सा.वि.म.(म), मुंबई यांचेकडे याबाबत त्यांना तक्रार करता येईल.

(ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा :-

या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा संचालक मंडळ यांच्याकडून घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल संचालक मंडळाच्या मान्यतेने करण्यात येतील.

(क) जन सामान्यांकडून सूचना :-

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गाभीर्यपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. तसेच या विभागाच्या अधिनस्त येणा-या सेवा उपभोगणा-या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी ही सनद नेहमीच सहकार्य करीत राहील.

नियम/परिपत्रक व नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

या सनदेची अंमलबजावणी दि. 01 एप्रिल, 2010 पासून करण्यास सा.लो.अ.सा.वि.म. (म.), मुंबई कटीबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील. सदर परिपत्रक तथा शासन निर्णयाची माहिती www.slasdc.com या संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात येते.

↓

# महामंडळाची प्रशासकीय पद रचना

मुख्य कार्यालय मुंबई

↓

व्यवस्थापकीय संचालक

↓

महाव्यवस्थापक
तथा अपिलीय अधिकारी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उपमहाव्यवस्थापक (प्रशासन) तथा जनमाहिती अधिकारी | उपमहाव्यवस्थापक (वित्त) तथा जनमाहिती अधिकारी लेखाधिकारी | उपमहाव्यवस्थापक (प्रकल्प) तथा जनमाहिती अधिकारी | उपमहाव्यवस्थापक (लेखा/ वसुली) तथा जनमाहिती अधिकारी | उपमहाव्यवस्थापक (जनमाहिती विभाग) |
| सहाय्यक महाव्यवस्थापक (प्रशा) | सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त) | सहाय्यक महाव्यवस्थापक (प्रकल्प) | सहाय्यक महाव्यवस्थापक (लेखा व वसुली) | सहाय्यक महाव्यवस्थापक तथा सहाय्यक जन माहिती अधिकारी |
| कार्यालयीन सहाय्यक | कार्यालयीन सहाय्यक (रोखपाल) | कार्यालयीन सहाय्यक | कार्यालयीन सहाय्यक | कार्यालयीन सहाय्यक |

लघुटंकलेखक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लिपीक/टंकलेखक | लिपीक /टंकलेखक | लिपीक /टंकलेखक | लिपीक/ टंकलेखक | लिपीक/ टंकलेखक |

वाहनचालक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शिपाई | शिपाई | शिपाई | शिपाई | शिपाई |

**प्रादेशिक स्तर**

**प्रादेशिक व्यवस्थापक तथा अपिलीय अधिकारी**

↓

कार्यालयीन सहाय्यक — लिपिक टंकलेखक — शिपाई

**जिल्हास्तर**

**जिल्हा व्यवस्थापक तथा जनमाहिती अधिकारी**

कार्यालयीन सहाय्यक — लिपिक टंकलेखक — शिपाई

# अधिकारी/कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य

## पदनिहाय मानके

### १. व्यवस्थापकीय संचालक ( प्रतिनियुक्तीवर )

**(वेतनश्रेणी रू. ३७४००-६७०००) (ग्रेड वेतन १००००/-)**

महामंडळाचे वाढीव भागभांडवल रू.१०००.०० कोटीचे असून त्यापैकी सन २०२२-२३ पर्यंत रू. ४८२.८४ लाख भागभांडवल प्राप्त झाले आहे. तसेच राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्तीय व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांचेकडून रू. १५३.९१ लाख निधी प्राप्त झाला आहे. महामंडळाचे कामकाज पाहण्याकरिता व संपुर्ण राज्यांमध्ये मातंग समाजाकरिता योजना प्रभावीपणे राबविणे व पर्यवेक्षण करणे/महामंडळाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे तसेच शासनास वेगवेगळया योजना प्रस्तावित करून मंजुर करून घेणे व त्या प्रभावीपणे राबवून मातंग समाजाचा अधिक विकास करण्यासाठी व्यवस्थापकीय संचालकांची शासनामार्फत प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात येते. व्यवस्थापकीय संचालक यांनी राज्यभर दौरे करून प्रत्येक जिल्हा कार्यालयांना येणा-या अडीअडचणी तसेच बँकेशी संपर्क साधणे, मंत्रालयीन बैठकांना उपस्थित राहणे, निधीबाबत वित्त विभागाकडील बैठकीस उपस्थित राहणे, राज्यस्तरीय बँकाच्या बैठकीस उपस्थित राहणे, इतर राज्याकडील योजना शासनाकडे मांडणे, शासन/सचिव स्तरावरील बैठकांना हजर राहणे, तसेच दिल्लीच्या बैठकांना उपस्थित राहणे करिता व्यवस्थापकीय संचालक यांचे पद महत्वाचे आहे.

### २. महाव्यवस्थापक (वेतनश्रेणी रू.१५६००-३९१००) (ग्रेड वेतन ६६००/-)

महामंडळांतर्गत महाराष्ट्र शासन तसेच केन्द्रशासनाच्या विविध योजना राबविण्यात येतात. सदर योजना मुख्यालय, ०७ प्रादेशिक कार्यालय, ३१ जिल्हा कार्यालयांमार्फत राबविण्यात येतात. सदर योजना प्रभावीपणेकरिता राबवित असतांना जिल्हा कार्यालयांकडून आलेले प्रस्ताव तपासून त्यानुसार जिल्हानिहाय उद्‌दिष्ट देऊन कर्ज मंजूरी प्रक्रिया राबविणे, शासनास व केन्द्र शासनास नविन प्रकल्प तयार करून प्रस्ताव सादर करणे , निधी मिळविण्यासाठी पत्रव्यवहार करणे व मंत्रालयात प्रत्यक्ष भेटी देणे, योजना प्रभावीपणे राबविण्याकरिता योजनाचे व लाभार्थीचे मुल्यांकन करणे व लाभार्थीना कर्ज मंजूरीनुसार निधीचे वाटप करणे तसेच मुख्यालय, प्रादेशिक कार्यालये व जिल्हा कार्यालयांवर नियंत्रण ठेवणे इ. कामे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक यांचेमार्फत केली जातात. त्यामुळे मा. व्यवस्थापकीय संचालक यांचेवर फार ताण निर्माण होतो.

महाव्यवस्थापक हे पद व्यवस्थापकीय संचालक यांच्या नंतरचे पद असल्याने व्यवस्थापकीय संचालकांना मंत्रालयीन स्तरावरील महामंडळाच्या संदर्भातील कामकाज तसेच वित्त नियोजन , शासन स्तरावरील मा. मंत्रीमहोदय / मा. सचिव/उपसचिव यांना आयोजित केलेल्या बैठकांना उपस्थित राहणे, राष्ट्रीय

अनुसूचित जातीय विकास महामंडळ, नवी दिल्ली यांना भेटी देणे इ. कामकाजामुळे जास्तवेळ मिळत नाही. त्यामुळे व्यवस्थापकीय संचालक व क्षेत्रीय अधिकारी यांच्यातील दुवा म्हणून महामंडळाचे आस्थापनेवर महाव्यवस्थापक हे पद आवश्यक आहे. महामंडळाच्या आस्थापनेवर असलेल्या प्रशासन / प्रकल्प / वित्त लेखा व वसुली विभागावर नियंत्रण ठेवणे , व्यवस्थापकीय संचालक यांचे दैनंदिन कामात मदत करणे , लेखापरिक्षण व लेखे पूर्ण करण्यास सहाय्य करणे , वसुली वाढविण्याकरिता प्रादेशिक / जिल्हा व्यवस्थापकांना मार्गदर्शन करणे व विभागांवर नियंत्रण ठेवणे इत्यादीकरिता महाव्यवस्थापक पद महामंडळाच्या आस्थापनेवर असणे अत्यंत आवश्यक आहे.

**3. उप महाव्यवस्थापक (प्रशासन ) ( वेतनश्रेणी रू.१५६००-३९१००) (ग्रेड वेतन ६६००/-)**

महामंडळामध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचा-यांची संख्या (94 + 1 प्रतियुक्तीवरील) 95 आहे. आहे. सदर कर्मचा-यांच्या सर्व सेवाविषयक बाबी यांचे नियंत्रण व्यवस्थापक, प्रशासन यांच्यामार्फत करण्यात येते.यामध्ये कर्मचा-यांच्या नियुक्त्या, बदल्या, रजा मंजूरी, भविष्य निर्वाह निधी विषयक बाबी, निवृत्ती वेतन प्रकरणे, न्यायालयीन बाबी, लोक आयुक्तांकडे आलेल्या तक्रारींचे निवारण करणे, कर्मचा-यांविषयीच्या तक्रारींचे निवारण करणे, महामंडळाच्या प्रशासकीय कामकाजामध्ये वेळोवेळी निर्माण होणा-या अडचणी व समस्या यांचे निराकरण करणे इत्यादी कामे व्यवस्थापक प्रशासन पाहतात. संपुर्ण राज्यातील महामंडळाच्या ९५ अधिकारी / कर्मचा-यांवर वर नमुद केल्याप्रमाणे सेवाविषयक बाबी व्यवस्थापक प्रशासन महामंडळाच्या स्थापनेपासून हाताळत आहेत.

**4. उप महाव्यवस्थापक (वित्त ) ( वेतनश्रेणी रू. १५६००-३९१००) (ग्रेड वेतन ६६००/-)**

महामंडळाच्या 31 जिल्हा कार्यालयातील सर्व कर्ज प्रकरणांचे निधी वितरण व्यवस्थापक वित्त व लेखा यांच्या नियंत्रणाखाली करण्यात येते. शासनाकडून महामंडळास प्राप्त होणारे भागभांडवल विशेष केन्द्रीय निधी व व्यवस्थापकीय अनुदान तसेच राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्तीय विकास महामंडळाकडून प्राप्त होणारा निधी यावर व्यवस्थापक (वित्त व लेखा) यांचे नियंत्रण व देखरेख असते. महामंडळास प्राप्त होणारा उक्त निधी महामंडळाच्या बँकेतील खात्यावर जमा करणे व आवश्यकतेनुसार त्यांचे जिल्हा कार्यालयांना वितरण करणे ही जबाबदारी येथील व्यवस्थापक (वित्त व लेखा) यांची आहे. त्याचप्रमाणे महामंडळातील कर्मचा-यांचे वेतन व तत्सम बाबी यांच्या कामकाजाचे नियंत्रण व्यवस्थापक (वित्त व लेखा) करीत आहेत. महामंडळाचे लेखे अद्ययावत करणे, लेखा परिक्षण करणे, लेखे शासनास सादर करणे, महामंडळाचा वार्षिक भांडवली अर्थसंकल्प तयार करणे तसेच प्रादेशिक व जिल्हा कार्यालयाच्या सर्व लेख्यांशी

संबधीत व निधी वाटपावर नियंत्रण ठेवण्याचे काम व्यवस्थापक वित्त व लेखा हाताळतात.

**5. उप महाव्यवस्थापक (लेखा ) ( वेतनश्रेणी रू. १५६००-३९१००) (ग्रेड वेतन ६६००/-)**

महामंडळांतर्गत महाराष्ट्र शासन तसेच केन्द्र शासनाच्या विविध योजना राबविण्यात येतात. सदर योजना राबविण्यासाठी मुख्यालयामार्फत 31 जिल्हा कार्यालयामार्फत कामकाज पाहिले जाते. सदर योजनांचे अंतर्गत लेखापरिक्षण करणे. महामंडळाचे लेखे अद्ययावत करणे, लेखा परिक्षण करणे, लेखे शासनास सादर करणे, महामंडळाचा वार्षिक भांडवली अर्थसंकल्प तयार करणे तसेच प्रादेशिक व जिल्हा कार्यालयाच्या सर्व लेखे संबधीत बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी उप महाव्यवस्थापक ( लेखा व लेखापरिक्षण ) या पदाची आवश्यकता आहे.

**6. उपमहाव्यवस्थापक (प्रकल्प ) ( वेतनश्रेणी रू. १५६००-३९१००) (ग्रेड वेतन ६६००/-)**

विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य (अनुदान, प्रशिक्षण योजना) योजनेतील लाभार्थ्यांची कर्ज प्रकरणे मंजूर करणे. एनएसएफडीसी योजनेअंतर्गत विविध व्यवसायांची प्रकरणे दिल्लीला पाठवून मंजूर करून घेणे तसेच त्याकरिता लागणारा आवश्यक निधी प्राप्त करून घेणे. लाभार्थींची निवड करणे , प्रादेशिक /जिल्हा कार्यालयाच्या वसुलीवर नियंत्रण ठेवणे. प्रादेशिक/जिल्हा कार्यालयांना वाटप केलेल्या निधीचे विनियोजन करणे. वसुलीकरिता प्रादेशिक व जिल्हा व्यवस्थापकांना मार्गदर्शन करणे. प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रादेशिक/जिल्हा कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावावर कार्यवाही करणे इत्यादी कामे राज्यस्तरावर व्यवस्थापक, प्रकल्प यांना करावी लागतात.

**7. उपमहाव्यवस्थापक ( वसुली ) ( वेतनश्रेणी रू. १५६००-३९१००) (ग्रेड वेतन ६६००/-)**

महामंडळाच्या आस्थापनेवर उपमहाव्यवस्थापक (वसूली) हे पद अत्यंत महात्वाचे असून राज्यात झालेल्या कर्जाच्या वाटपाची वसूली होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शासनास वसूली विषयक माहिती वेळोवेळी पाठवावी लागते. तसेच जिल्हा कार्यालयांकडून येणारी वसूली यामध्ये फार मोठया प्रमाणात वाढ होण्याकरीता जिल्हा कार्यालयांना भेटी देणे, जिल्हा व्यवस्थापकांना वसूलीमध्ये जागरूकता आणणे वसूलीबाबत आढावा घेणे , प्रादेशिक स्तरांवर वसुलीबाबत बैठका घेणे. राष्ट्रीय अनुसूचित जातीय विकास महामंडळाच्या कर्जाची वसूली करणे, जिल्हा कार्यालयांशी पत्र व्यवहार करणे, नवी दिल्ली येथे वसूली पाठविण्याच्या कामात व्यवस्थापकीय संचालकांना मदत करणे , महामंडळाच्या कामकाजामध्ये प्रकल्प विभागाचे जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा जास्त महत्त्व

उपमहाव्यवस्थापक (वसूली) या पदास आहे. करिता महामंडळाचे आस्थापनेवर उपमहाव्यवस्थापक (वसूली) हे पद असणे आवश्यक आहे.

**8. प्रादेशिक व्यवस्थापक ( वेतनश्रेणी रू. १५६००-३९१००) (ग्रेड वेतन ६६००/-)**

मुख्यालयाकडून पाठविण्यात आलेल्या निधीचे जिल्हयांच्या मागणी प्रमाणे जिल्हा कार्यालयांना वितरण करणे व नियंत्रण करणे, विभागात राबविण्यात येणा-या योजनांचा मासिक आढावा घेणे, जिल्हा कार्यालयाकडून आलेल्या कर्ज प्रस्तावावर कार्यवाही करून मुख्यालयास पाठविणे, योजनांचे मुल्यांकन करणे त्याचप्रमाणे वसुली करणे व वसुलीकरिता लाभार्थ्यांना प्रवृत्त करणे, विभागीय स्तरावरील बैठकांना उपस्थित राहणे , विभागांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचा यांवर नियंत्रण ठेवणे. विभागांतर्गत लेखे पुर्ण करून घेणे . तसेच शासनाने व मुख्यालयाने मागविलेली माहिती पुरविणे इत्यादी कामे प्रादेशिक व्यवस्थापकांना करावी लागतात.

**9.सहा. उपमहाव्यवस्थापक (प्रशासन ) - (वेतनश्रेणी रू.९३००-३४८०० ) (ग्रेड वेतन ४४००/-)**

सहा. उपमहाव्यवस्थापक प्रशासन हे उपमहाव्यवस्थापक प्रशासन यांना त्यांच्या कामामध्ये सहाय्य करतात.

**10.सहा. उपमहाव्यवस्थापक(प्रकल्प )-( वेतनश्रेणी रू. ९३००-३४८०० ) (ग्रेड वेतन ४४००/-)**

सहा. उपमहाव्यवस्थापक हे व्यवस्थापक, प्रकल्प यांना त्यांच्या कामामध्ये सहाय्य करतात.

**11.सहा. उपमहाव्यवस्थापक (वित्त ) - (वेतनश्रेणी रू. ९३००-३४८०० ) (ग्रेड वेतन ४४००/-)**

सहा. उपमहाव्यवस्थापक (वित्त) हे व्यवस्थापक वित्त यांना त्यांच्या कामामध्ये सहाय्य करतात.

**12.सहा. उपमहाव्यवस्थापक (लेखे ) - ( वेतनश्रेणी रू. ९३००-३४८०० ) (ग्रेड वेतन ४४००/-)**

सहा. उपमहाव्यवस्थापक ( लेखे) हे व्यवस्थापक (लेखे) यांना त्यांच्या कामामध्ये सहाय्य करतात.

**13.जिल्हा व्यवस्थापक ( वेतनश्रेणी रू. ९३००-३४८०० ) (ग्रेड वेतन ४४००/-)**

महामंडळाची राज्यामध्ये सध्या 31 जिल्हा कार्यालये कार्यरत आहेत. जिल्हा व्यवस्थापकांकडे महामंडळाच्या योजना राबविणे, लाभार्थीशी संपर्क साधणे, कर्ज वितरण व वसुली करणे , जिल्हा कार्यालयाचे नियंत्रण करणे, सर्व योजनांची माहिती लाभार्थीना देऊन लाभास प्रवृत्त करणे इत्यादी बाबी जिल्हा व्यवस्थापक

हाताळतात. तसेच कर्ज प्रकरणांबाबत बँकाशी संपर्क ठेवणे, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वेळोवेळी आयोजित केलेल्या बैठका यामध्ये महामंडळाचे प्रतिनिधित्व करणे हे देखील कामकाज जिल्हा व्यवस्थापक करतात.

**14.जिल्हा व्यवस्थापक (वसुली) ( वेतनश्रेणी रू. ९३००-३४८०० ) (ग्रेड वेतन ४४००/-)**

महामंडळांतर्गत महाराष्ट्र शासन व केन्द्र शासनाच्या विविध योजना राबविण्यात येतात. सदर योजनांतर्गत मातंग समाज व तत्सम पोट जातीतील लोकांचा आर्थिक , शैक्षणिक, विकास होण्यासाठी त्यांना व्यवसाय करणे, शिक्षण घेणे यासाठी कर्जाचे स्वरूपात आर्थिक मदत केली जाते. ज्या लाभार्थींना कर्ज दिलेले आहे. त्यांचेकडून कर्जाची वसुली करणे आवश्यक असते. जिल्हा कार्यालयांर्गत जिल्हा व्यवस्थापकांना लाभार्थी यांच्या अडीअडचणी सोडविणे, स्थळ तपासणी करणे , स्थानिक बँकांच्या बैठकांना उपस्थिती लावणे , मा. कलेक्टर यांच्या बैठकांना जाणे, मुख्यालय , प्रादेशिक स्तरांवरील मागविलेली माहिती वेळीच पाठविणे , माहिती अधिकांतर्गत मागविलेली माहिती पुरविणे इ. कामे असल्यामुळे कर्जाची वसुली करण्यासाठी लाभार्थींच्या प्रत्येक्ष भेटी देणे, नोटीसा पाठविणे इ. कामे जिल्हा व्यवस्थापक (वसुली) यांचेकडून करता येतात. त्यामुळे वसुलीत मोठयाप्रमाणावर वाढ होईल. करिता महामंडळाचे आस्थापनेवर जिल्हा व्यवस्थापक (वसूली) हे पद असणे आवश्यक आहे.

**15.सहाय्यक लेखाधिकारी (प्रतिनियुक्तीने)-(वेतनश्रेणी रू.९३००-३४८०० ) (ग्रेड वेतन ४३००/-)**

मुख्यालय तसेच जिल्हा कार्यालयाच्या कर्मचा-यांचे पगारपत्रक तयार करणे , कर्मचा-यांच्या देय वेतनवाढ काढणे, मुख्यालयातील किरकोळ खर्चासंबंधीची नोंदवही ठेवणे व त्यात नोंद केलेली देयक जतन करून ठेवणे, योजनानिहाय रोख वहीत नोंद ठेवणे व मंजूर झालेल्या खर्चाच्या नोंदी नोंदवहीत घेणे, मुख्यालयातील रोख नोंद वहीवर आधारित लेजर लिहीणे, महामंडळातील अधिकारी व कर्मचा-यांचे प्रवास भत्त्याची देयके, वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती व इतर अनुषंगीक देयक तयार करणे व अदा करणे महामंडळाच्या अधिका-यांच्या आयकर कपातीबाबत संपुर्ण कार्यवाही करणे इत्यादी लेखा विभागातील सर्व कामे सहाय्यक लेखाधिकारी करीत असतात.

**16.कार्यालयीन सहायक ( वेतनश्रेणी रू.५२००-२०२०० ) (ग्रेड वेतन २८००/-)**

कार्यालयीन सहायक जिल्हा कार्यालयांमध्ये जिल्हा व्यवस्थापक यांना त्यांच्या कामामध्ये मदत करतात. तसेच ज्या जिल्हा कार्यालयात जिल्हा व्यवस्थापकांची

पदे अस्तित्वात नाहीत तेथे इतर जिल्हा कार्यालयामध्ये जिल्हा व्यवस्थापक जी कामे करतात ती सर्व कामे कार्यालयीन सहायक करत आहेत. महामंडळाच्या मुख्यालयामध्ये कार्यालयीन सहायक हे व्यवस्थापकीय संचालक, व्यवस्थापक(प्रशासन), व्यवस्थापक (प्रकल्प ), व्यवस्थापक ( वित्त व लेखा ) यांना त्यांच्या कामामध्ये मदत करतात. जिल्हा कार्यालयांमध्ये लाभार्थ्यांची कर्ज प्रकरणे स्विकारून त्यांची छाननी करणे , स्थळ पाहणी करणे, बँकाना भेटी देणे, दस्तऐवज तयार करणे, कर्ज वितरण करण्याकरिता जिल्हा व्यवस्थापकांना मदत करणे, कर्ज वसुली करणे इत्यादी कामे हाताळतात.

**17. लघुटंकलेखक ( मराठी ) (निम्मश्रेणी )( वेतनश्रेणी रू.५२००-२०२०० ) (ग्रेड वेतन २४००/-)**

हे पद मुख्यालयातच आहे. व्यवस्थापकीय संचालकांचे श्रुतलेखन व तत्सम बाबी इत्यादीचे कामकाज लघुलेखक हाताळतात.

**18. लिपीक/टंकलेखक ( वेतनश्रेणी रू. ५२००-२०२०० ) (ग्रेड वेतन १९००/-)**

महामंडळाचे मुख्यालय , प्रादेशिक विभाग व जिल्हा कार्यालयात लिपिक/टंकलेखक कार्यरत असून ते जिल्हा व्यवस्थापक / कार्यालयीन सहाय्यक यांना त्यांच्या कामामध्ये मदत करतात. जिल्हा कार्यालयांमध्ये लाभार्थ्यांची कर्ज प्रकरणे स्विकारून त्यांची छाननी करणे , सदर कर्ज प्रस्ताव बँकाना पाठविणे , बँकेचे व्यवहार पाहणे, स्थळ पाहणी करणे, बँकाना भेटी देणे, दस्तऐवज तयार करणे, कर्ज वितरण करण्याकरिता वरीष्ठाना मदत करणे, इ. कामे लिपिक/टंकलेखेक यांचेमार्फत केली जातात.

**19. वाहनचालक ( वेतनश्रेणी रू.५२००-२०२०० ) (ग्रेड वेतन १९००/-)**

व्यवस्थापकीय संचालक व अध्यक्ष यांचे वाहन चालविणे हे काम वाहन चालक करतात. सध्या महामंडळाचे 07 प्रादेशिक कार्यालये सुरू असून महात्मा फुले मागासवर्गीस विकास महामंडळाच्या धर्तीवर याही महामंडळाच्या अधिका-यांना वाहन देण्याचे प्रस्तावित आहे.

**20. शिपाई ( वेतनश्रेणी रू. ४४४०-७४४० ) (ग्रेड वेतन १३००/-)**

महामंडळाच्या मुख्यालयात , प्रादेशिक कार्यालयात व जिल्हा कार्यामध्ये शिपाई कार्यरत असून महामंडळाच्या कार्यालयांतील सर्व कामे शिपाई करत आहेत.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.), मुंबई

## (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
## अधिकारी व कर्मचारी यांची निर्देशिका

| अ. क्र. | पदनाम | कार्यालयाचा पत्ता | दुरध्वनी/ फॅक्स क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | व्यवस्थापकीय संचालक | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), नविन प्रशासकीय इमारत क्र.२, ३ रा मजला, बी विंग, आर.सी.मार्ग, चेंबूर (पुर्व), मुंबई- ४०० ०७१ | 022-25220002<br>022-25274072 |
| २. | महाव्यवस्थापक | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), नविन प्रशासकीय इमारत क्र.२, ३ रा मजला, बी विंग, आर.सी.मार्ग, चेंबूर (पुर्व), मुंबई- ४०० ०७१ | 022-25220002<br>022-25274072 |
| ३. | उप महाव्यवस्थापक (प्रकल्प) (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), नविन प्रशासकीय इमारत क्र.२, ३ रा मजला, बी विंग, आर.सी.मार्ग, चेंबूर (पुर्व), मुंबई- ४०० ०७१ | 022-25220002<br>022-25274072 |
| ४. | उप महाव्यवस्थापक (प्रशासन) (अति.कार्य.)तथा जनमाहिती अधिकारी | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), नविन प्रशासकीय इमारत क्र.२, ३ रा मजला, बी विंग, आर.सी.मार्ग, चेंबूर (पुर्व), मुंबई- ४०० ०७१ | 022-25220002<br>022-25274072 |
| ५. | उप महाव्यवस्थापक (वित्त) जनमाहिती अधिकारी | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), नविन प्रशासकीय इमारत क्र.२, ३ रा मजला, बी विंग, आर.सी.मार्ग, चेंबूर (पुर्व), मुंबई- ४०० ०७१ | 022-25220002<br>022-25274072 |
| ६. | उप महाव्यवस्थापक (वसुली व लेखे) (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), नविन प्रशासकीय इमारत क्र.२, ३ रा मजला, बी विंग, आर.सी.मार्ग, चेंबूर (पुर्व), मुंबई- ४०० ०७१ | 022-25220002<br>022-25274072 |
| ७. | सहा.महाव्यवस्थापक (प्रकल्प) तथा सहा. जनमाहिती अधिकारी | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), नविन प्रशासकीय इमारत क्र.२, ३ रा मजला, बी विंग, आर.सी.मार्ग, चेंबूर (पुर्व), मुंबई- ४०० ०७१ | 022-25220002<br>022-25274072 |
| ८. | सहा. महाव्यवस्थापक (ज.मा.वि.) तथा अपिलीय अधिकारी | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), नविन प्रशासकीय इमारत क्र.२, ३ रा मजला, बी विंग, आर.सी.मार्ग, चेंबूर (पुर्व), मुंबई- ४०० ०७१ | 022-25220002<br>022-25274072 |
| ९. | प्रादेशिक व्यवस्थापक, तथा अपिलीय अधिकारी, मुंबई | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), रुम नं.33/35, गृहनिर्माण भवन, कलानगर, तळमजला, वांद्रे | 022-26591124 |

| | | | |
|---|---|---|---|
| | विभाग | (पूर्व), मुंबई-400 066. | |
| १०. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, मुंबई उपनगर | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), रुम नं.33/35, गृहनिर्माण भवन, कलानगर, तळमजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-400 066. | 022-26591124 |
| ११. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, ठाणे | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), जिल्हाधिकारी कार्यालय, 5 वा मजला,कोर्ट नाका, ठाणे | 022-25388413 |
| १२. | जिल्हा व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी, रायगड | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,जिल्हा परिषद शाळे मागे मु. गोधळपाडा, पो. वेचवी, ता. अलिबाग, जि. रायगड. | 02141-221307 |
| १३. | जिल्हा व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी, पालघर | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.),नौली फाटक, अफरीन अपार्टमेंट, ऑफिस नं.203, पालघर (पुर्व), जि.ठाणे. | 022-25388413 |
| १४. | प्रादेशिक व्यवस्थापक, तथा अपिलीय अधिकारी, पुणे | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दक्षिण बाजु, 2 रा माळा, पुणे 411 018 | 020-29703065 |
| १५. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, पुणे | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), 424, मंगळवार पेठ, वर्षा लॉजसमोर, लडकत पेट्रोल पंपाजवळ, पुणे | 020-29703057 |
| १६. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, सातारा | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), प्रसन्न आर्केट, 34 अ दुर्गापेठ दत्त मंदीर शेजारी, सातारा. - 415 001 | 02162-298114 |
| १७. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, सांगली | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुना बुधगांव रोड, रेल्वे क्रॉसींग जवळ, संभाजीनगर, सांगली | 0233-2374969 |
| १८. | जिल्हा व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी, कोल्हापूर | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), प्रशासकीय इमारत, तळमजला, कसबा बावडा, कोल्हापूर | 0231-2663916 |
| १९. | जिल्हा व्यवस्थापक, तथा | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब | 0217-2311523 |

| | | | |
|---|---|---|---|
| | जनमाहिती अधिकारी, सोलापूर | आंबेडकर सामाजिक न्याय भवन,दुसरा मजला, सात रस्ता, शासकीय विश्रामगृह पाठीमागे, सोलापूर. - 413 001 | |
| २०. | प्रादेशिक व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा अपिलीय अधिकारी, नाशिक | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, व्दारकेच्या पुढे, नासर्डी पुलाजवळ, नाशिक रोड, नाशिक. - ४२२ ००१ | 0253-2236849 |
| २१. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, नाशिक | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, व्दारकेच्या पुढे, नासर्डी पुलाजवळ, नाशिक रोड, नाशिक. - ४२२ ००१ | 0253-2236081 |
| २२. | जिल्हा व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी, धुळे | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), 36, ए, साक्री रोड, सहवास निवास, यशवंतनगर, धुळे | 02562-276131 |
| २३. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, जळगांव | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, महाबळ रोड, मायादेवीनगर, स्टॉप समोर, हातणूर कॉलनी, जळगांव | 0257-2263294 |
| २४. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, अहमदनगर | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), महात्मा फुले चौक, सहकार कॉलनी, सभागृह रोड, मार्केट यार्ड, 2 रा मजला, अहमदनगर | 0241-2995517 |
| २५. | जिल्हा व्यवस्थापक, (अति.कार्य.)तथा जनमाहिती अधिकारी, नंदुरबार | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, टोकर तलाव रोड, जिल्हाधिकारी कार्यालयापूढे, नंदुरबार | 02564-210181 |
| २६. | प्रादेशिक व्यवस्थापक, तथा अपिलीय अधिकारी, औरंगाबाद | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवाजी हायस्कुल शेजारी, खोकडपुरा,औरंगाबाद. - 431001 | 0240-2344122 |
| २७. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, औरंगाबाद | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,शिवाजी हायस्कुल शेजारी, खेकडपुरा, औरंगाबाद. - 431 001 | 0240-2344122 |
| २८. | जिल्हा व्यवस्थापक, तथा | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब | 02452-222680 |

| | | | |
|---|---|---|---|
| | जनमाहिती अधिकारी, परभणी | आंबेडकर सामाजिक न्याय भवन,जायकवाडी वसाहत, कारेगांव रोड, परभणी. - 431 203 | |
| २९. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, बीड | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,शासकीय विश्रामगृहासमोर नगर रोड, बीड. - 431 122 | 02442-224916 |
| ३०. | जिल्हा व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी, जालना | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सर्वे नं.488, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जालना | 02482-224902 |
| ३१. | प्रादेशिक व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा अपिलीय अधिकारी, लातूर | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, तळमजला,शिवनेरीगेटसमोर,डाल्डा फ़ॅक्टरी कंम्पाऊंड, लातूर | 02382-243989 |
| ३२. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, लातूर | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | 02382-257050 |
| ३३. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, नांदेड | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ग्यानमाता शाळे समोर,हिंगोली रोड, नांदेड. | 02462-220088 |
| ३४. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, उस्मानाबाद | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला नं. 9, उत्तर बाजु, उस्मानाबाद | 02472-226602 |
| ३५. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, हिंगोली | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,जिल्हा सरकारी रुग्णालयाचा पठीमागे,रीसाला बाजार ,हिंगोली. — 431513 | 02456-223831 |
| ३६. | प्रादेशिक व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा अपिलीय अधिकारी, अमरावती | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 'बि' विंग, टी. बी. हॉस्पिटल मागे, एस. पी. ऑफीस जवळ, अमरावती. - 444601 | 0721-2992766 |
| ३७. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, अमरावती | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), 'ए' विंग, टी.बी. हॉस्पिटल मागे, एस. पी. ऑफिस जवळ, अमरावती. - 444 601 | 0721-2552331 |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, यवतमाळ | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पोलीस वसाहतीच्या मागे,यवतमाळ. | 07232-247573 |
| ३९. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, बुलढाणा | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,चिखली रोड,बुलडाणा. - 443 001 | 07262-247959 |
| ४०. | (अति.कार्य.) जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, अकोला | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), ॲड जी. आर. पाटील बंगला, महसुल कॉलनी, एस. टी. स्टॅड मागे, दै. जनाध्यम कार्यालाया समोर,अकोला. - 444 001 | 0724-2414279 |
| ४१. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, वाशिम | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,चिखली रोड, वाशिम. - 444 505 | 07252-295017 |
| ४२. | प्रादेशिक व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा अपिलीय अधिकारी, नागपूर | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 'B' विंग ३रा मजला, रुम नं.- ३०२, शासकीय आय.टी.आय. समोर, साऊथ अंबाजरी रोड, नागपूर. - ४४००२२ | 0712-2249355 |
| ४३. | जिल्हा व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी, नागपूर | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 'B' विंग ३रा मजला, रुम नं.- ३०२, शासकीय आय.टी.आय. समोर, साऊथ अंबाजरी रोड, नागपूर. - ४४००२२ | 0712-2249355 |
| ४४. | जिल्हा व्यवस्थापक, तथा जनमाहिती अधिकारी, वर्धा | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,सेवाग्राम रोड, लक्ष्मीनगर, वर्धा. - 444 505 | 07152-231297 |
| ४५. | जिल्हा व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी, भंडारा | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,जिल्हा परिषद चौक,भंडारा-441 904 | 07184-299271 |
| ४६. | जिल्हा व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी, चंद्रपूर | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जलनगर, रय्यतवारी रोड, आरटिओ ऑफीसजवळ, | 07172-263140 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चंद्रपूर | |
| ४७. | जिल्हा व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी, गोंदिया | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या.), डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, पतंगा मैदान, कलेक्टर ऑफीस मागे, आमगाव रोड, गोंदीया | 07182-299216 |
| ४८. | जिल्हा व्यवस्थापक, (अति.कार्य.) तथा जनमाहिती अधिकारी, गडचिरोली | - | 07132-222882 |

# <u>महामंडळामार्फत सध्या राबविण्यात येत असलेल्या योजना</u>

## १) महामंडळास प्राप्त होणा-या विशेष केन्द्रीय अर्थसहाय्याच्या निधीतून राबविण्यात येत असलेल्या योजना

महामंडळास विशेष केन्द्रीय अर्थसहाय्यांर्गत प्राप्त होणा-या निधीतून केन्द्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार खालील योजना राबविण्यात येतात.

### <u>अ) अनुदान योजना -</u>

विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या निधीतून अनुदान योजना राबविण्यात येते. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्ा रुपये ३०००००/- लाखापर्यंत आहे अशा कुटुंबातील अर्जदाराना रु.५०,०००/- पर्यंत प्रकल्प मर्यादा असलेल्या व्यवसायासाठी बँकेच्या सहाय्याने कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. एकुण मंजूर प्रकल्प रक्कमेमध्ये ५०% किंवा जास्तीत जास्त रु.१०,०००/- यापैकी जी कमी असेल ती रक्कम महामंडळामार्फत लाभार्थीस अनुदान म्हणुन दिली जाते. उर्वरित रक्कम बँकेकडुन कर्जाचे रूपात वितरीत करण्यात येते.

### <u>ब) प्रशिक्षण योजना -</u>

विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या एकूण निधीच्या १०% रक्कम ही प्रशिक्षण योजनेवर खर्च करण्यात येतो. मातंग समाजातील इयत्ता ४ थी पासून पुढे शिक्षण घेतलेल्या १८ ते ३५ वयोगटातील युवक/युवतींना वाहन चालक, वेल्डींग, मोटर मॅकनिकल, शिवण काम, ब्युटीपार्लर, फिटर, रेडीओ/टीव्ही दुरूस्ती, सुतार काम इ. व्यवसायिक प्रशिक्षण शासन मान्य संस्थांमार्फत दिले जाते. ज्यामुळे युवक/युवतींना स्वयंरोजगार मिळण्यास सोयिस्कर होते.

## २) राज्य शासनाकडून महामंडळास प्राप्त होणा-या भागभांडवल (Share Capital) निधीमधून  राबविण्यात येत असलेल्या योजना.

राज्य शासनामार्फत महामंडळास भागभांडवली अंशदान निधी प्राप्त होत असतो. सदर प्राप्त निधीतून खालील योजना राबविण्यात येतात.

### <u>अ) बीजभांडवल योजना :-</u>

राज्य शासनाकडून महामंडळास प्राप्त होणा-या भागभांडवलाचे निधीतून बीजभांडवल योजना राबविण्यात येते.  सदर योजना महामंडळ व बँकेच्या सहाय्याने राबविण्‌यात येते. मातंग समाज व १२ पोट जातीतील ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (शहरी व ग्रामिण भागात) रू. ३,००,०००/- पेक्षा जास्त नाही अशा कुटुंबातील गरजू व्यक्तींना  बीजभांडवल योजनेअंतर्गत रू. ५०००१/- ते रू. ७०००००/- पर्यंतच्या गुंतवणूक असलेल्या वैयक्तिक प्रकल्प **प्रस्ताव** बँकेकडे मंजूरीकरिता शिफारस करण्यात येतात. बँकेची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर **मंजूर प्रकल्प रक्कमेच्या प्रमाणात** महामंडळाकडून ४५% सहभाग (रु.१००००/- अनुदानासह) बीजभांडवल निधी

कर्जरुपात ४% **वार्षिक** व्याजदराने मंजूर करण्यात येतो. उर्वरित ५०% हिस्सा हा बँक व ५% सहभाग लाभार्थ्यांचा असतो.

तसेच राष्ट्रीय अनुसुचित जाती वित्तीय विकास महामंडळ (NSFDC) दिल्ली यांचेकडून मंजुर होणाऱ्या विविध योजनेअंतर्गत सुमारे २०% कर्ज रक्कमाचा हिस्सा महामंडळाचे भागभांडवलाच्या निधीतून लाभार्थीस वितरीत केला जातो.

## <u>ब) थेट कर्ज योजना :-</u>

शासन निर्णय क्र. एलएएस-२०२२/प्र.क्र.९४/महामंडळे/दि. ०४ नोव्हेंबर २०२२ अन्वये महामंडळामार्फत भागभांडवल निधीतून राबविण्यात येत असलेल्या थेट कर्ज योजनेचे कर्ज मर्यादा रू. २५०००/- वरून रू. १०००००/- पर्यंत वाढविण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये महामंडळाचे भांगभाडवल निधी रू. ८५०००/-, अनुदान निधी रू. १००००/- व लाभार्थीचा सहभाग रक्कम रू. ५०००/- असे एकूण रू. १०००००/- कर्ज द.सा.द.शे. ४% व्याज दराने लाभार्थींना वितरीत करण्यात येते. सदर कर्ज लाभार्थीकडून ३६ समान हप्त्यामध्ये वसुल करण्यात येते.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना :-

मातंग **समाज व तत्सम 12 पोट जातीतील विद्यार्थ्यांना** प्रती वर्षी इयत्ता १० वी ,१२ वी ,पदवी व पदविका व पदव्युत्तर परीक्षेत कमीत **कमी** ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या विद्यार्थी व विद्यार्थींची जिल्हानिहाय प्राप्त गुणाच्या टक्केवारीनुसार निवड केली जाते व उपलब्ध निधीच्या मर्यादेत शिष्यवृत्ती एकदाच पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन पर दिली जाते. ही योजना मा. मुख्यमंत्री निधीतून महामंडळास मिळालेल्या २०.०० लाख निधीच्या मिळणा-या व्याजातून प्रतिवर्षी राबविण्यात येते.

**शिष्यवृत्ती**-१)१०वी-रुपये १,०००/-२)१२ वी- रुपये १,५००/-३) पदवी व पदविका -रुपये २,०००/- ४) पदव्युत्तर - रुपये २,५००/-

## ३) राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्तीय विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना (NSFDC)

## १) <u>मुदत कर्ज योजना</u>

सदर योजनेअंतर्गत विविध व्यवसायांकरिता एन.एस.एफ.डी.सी. मार्फत रू. ५.०० लाखापर्यंत असलेल्या व्यवसायांकरिता मुदत कर्ज मंजूर केले जाते. सदर कर्ज रक्कमेमध्ये ७५% हिस्सा हा एनएसएफडीसी महामंडळाचा असतो. २०% हिस्सा महामंडळाचे भागभांडवल निधीतून (रू. १००००/- अनुदानासह) देण्यात येतो. उर्वरित ५% रक्कम ही लाभार्थीची असते. सदर कर्जाची परतफेड जास्तीत जास्त ५ वर्ष असते. एनएसएफडीसीच्या रक्कमेवर द.सा.द.शे. ६% व महामंडळाच्या रक्कमेवर द.सा.द.शे. ४% व्याज आकारण्यात येते.

## <u>२) लघुऋण वित्त योजना :-</u>

एनएसएफडीसी योजने अंतर्गत लघुऋण वित्त योजना सन २०००-०१ पासून राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत प्रती लाभार्थी एन.एस.एफ.डी.सी.चे मुदत कर्ज रू. ४००००/- व महामंडळाचे अनुदान रू. १००००/- असे एकूण रू. ५००००/- च्या मर्यादेत लघु उद्योगांमध्ये लाभ देण्यात येतो द.सा.द.शे. ४% व्याज आकारण्यात येते.

## ३) <u>महिला समृध्दी योजना :-</u>

महिला समृध्दी योजना (MSY) ही योजना सन २००४-०५ पासून महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजना ही एन.एस.एफ.डी.सी कडून प्राप्त होणा-या निधीतून राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत प्रती लाभार्थी एन.एस.एफ.डी.सी.चे मुदत कर्ज रू. ४००००/- व महामंडळाचे अनुदान रू. १००००/- असे एकूण रू. ५००००/- च्या मर्यादेत लाभ देण्यात येतो द.सा.द.शे. ४% व्याज आकारण्यात येते.

**४) शैक्षणिक कर्ज योजना :-**

मातंग समाजातील युवक-युवतींना एनएसएफडीसी योजनेअंतर्गत देशांत व परदेशांत उच्च शिक्षण घेण्याकरिता एनएसएफडीसी अंतर्गत शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येते. देशांतर्गत उच्च शिक्षण घेणा-या विदयार्थींना रू. १०,००,०००/- व परदेशांतर्गत उच्च शिक्षण घेणा-या विदयार्थींना रू. २०,००,०००/- कर्ज मंजूर केले जाते. सदर कर्जाची परतफेड शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यापासून अथवा सर्व्हिस लागले पासून करावयाची असते द.सा.द.शे. ४% व्याज आकारण्यात येते.

## महामंडळाने शासनास प्रस्तावित केलेल्या नाविन्यपूर्ण योजना

### १) शैक्षणिक कर्ज योजना

मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील युवक-युवतींमध्ये शिक्षण घेण्याचा ओघ जास्त प्रमाणात असून उच्च शिक्षण घेण्याकडेही जास्त प्रमाणात कल दिसून येतो. तथापि, सदर समाज हा आर्थिक परिस्थितीमुळे दुर्बल असून त्यांच्याकडे उत्पन्नाची कोणतेही साधने उपलब्ध नाही. तसेच शासकिय यंत्रणेकडे किंवा बँकेकडे शैक्षणिक कर्जाची मागणी करूनही बँका सदर युवक-युवतींना कर्ज उपलब्ध करून देत नाहीत. त्यामुळे मातंग समाजाच्या युवक-युवतींना इच्छा व पात्रता असूनही उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते.

क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शिफारस केलेल्या ८२ शिफारशींपैकी ६८ शिफारशींना तत्वत: मंजूरी दिलेली असून सदर ६८ शिफारशींपैकी १९ शिफारशी हया महामंडळाशी संबधित आहेत. १९ शिफारशीतील शिफारस क्र. ६३/२९ व संचालक मंडळाच्या १०२ व्या बैठकीतील ठराव क्र. १०२/१७ अन्वये मंजूर ठरावानुसार कार्यवाही करणेकरिता महामंडळाकडील उपलब्ध भागभांडवलाचे निधीतून शैक्षणिक कर्ज योजना राबविणेंस मान्यता मिळावी म्हणून याकरिता या कार्यालयाचे पत्र क्र. एलएएसव्हीएम/ व्यसं / प्रकल्प / शैकयो / १११९ / २०२२-२३/ दि.२७-०७-२०२२ अन्वये प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्यास मंजूरी मिळावी ही विनंती आहे.

## २) महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या थेट कर्ज योजना रू. १.०० लाख ते रू. ५.०० लाख अशा कर्ज मर्यादेत राबविणेस मान्यता मिळणेबाबत.

महामंडळामार्फत शासन निर्णय क्र. एलएएस-२०२२/प्र.क्र.९४/ महामंडळे दि. ०४-११-२०२२ अन्वये रू. १.०० लाख प्रकल्प मर्यादा असलेली थेट कर्ज योजना राबविण्यात येत आहे. सध्याचा महागाईचा निर्देशांक पाहता कच्च्या मालाच्या वाढलेल्या किंमती, उत्तम दर्जाच्या वस्तु खरेदी करण्याचा ग्राहकांचा कल , उदयोगांसाठी लागणा-या भांडवली व पायाभूत गुंतवणुकीत झालेली वाढ इ. मुळे उत्तम दर्जाचे व्यवसाय करणेकरिता रू. १ लाख कर्ज रक्कमेमध्ये उदयोग करणे अशक्य होते.

मा. सचिव (सा.न्या. व वि.स.वि.) यांचे अध्यक्षतेखाली दि. ०२-०५-२०२३ रोजी झालेल्या बैठकीत मा. सचिव महोदयांचे लाभार्थीच्या गरजेनुसार रू. १.०० लाख ते ५.०० लाख अशी राबविणेबाबतचा अदयावत प्रस्ताव शासनास सादर करावा असे निर्देश दिले आहे. तसेच क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शिफारस केलेल्या शिफारशीतील शिफारस क्र. ६२/२३ अन्वये कार्यवाही करणेकरिता व विचार करून व सध्याच्या महागाईचा निर्देशांक पाहता कच्च्या मालाच्या वाढलेल्या किंमती, उत्तम दर्जाच्या वस्तु खरेदी करण्याचा ग्राहकांचा कल , उदयोगांसाठी लागणा-या भांडवली व पायाभूत गुंतवणुकीत झालेली वाढ इ. विचार करून महामंडळाकडील उपलब्ध असलेल्या भागभांडवल निधीतून खर्च करण्यात येत असल्याने थेट कर्ज योजनेची कर्ज मर्यादा रू. १.०० लाख ते ५.०० लाख अशा स्वरूपात राबविणेंस मान्यता मिळावी याबाबत कार्यालयाचे पत्र क्र. एलएएस व्हीएम / व्यसं / प्रकल्प /१७९२ /२०२२-२३/ दि.०१/१२/२०२२ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

## 3)लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेकरिता महामंडळाचे ठेवीवरील व्याजाचे रक्कमेतून रू. २०.०० लाख निधी प्रती वर्षी खर्च करणेबाबत.

तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी शासन पत्र दि. ०७-०९-१९९३ अन्वये मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन रु. २०.०० लाख निधी महामंडळास अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेकरिता उपलब्ध करुन दिले आहेत. सदर निधी मुदत ठेवीमध्ये ठेवण्यात आलेला असून सदर निधीवर प्रती वर्षी मिळणा-या व्याजाच्या रक्कमेतून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. प्रती वर्षी १० वी, १२ वी, पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमांत ६०% किंवा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणा-या गुणवंत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील युवक / युवतींना पुढील शिक्षणाकरिता प्रोत्साहन मिळावे म्हणून गुणानुक्रमे व जेष्ठतेनुसार अनुक्रमे रू.१०००/-, रू. १५००/- रू. २०००/- व रू. २५००/- याप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.

सध्या महामंडळाने केलेल्या रू. २०.०० लाख ठेवीवर मिळणारे व्याज अत्यंत कमी म्हणजे सुमारे १.०० लाख ते १.१५ लाख एवढेच व्याज महामंडळास मिळते. अपु-या निधीमुळे प्रत्येक जिल्हा कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सुमारे ९० ते १०० विदयार्थ्यांच्या मागणी अर्जापैकी फक्त २ ते ०३ च विदयार्थ्यांना या योजनेचा लाभ देता येतो व उर्वरित विदयार्थी सदर योजनेपासून वंचित राहतात. पात्रता असूनही शिष्यवृत्ती योजनेचा लाभ न मिळाल्याने सदर विदयार्थीमध्ये असंतोष निर्माण होतो व ते महामंडळ तसेच शासनावर नाराज होतात. परिणामी महामंडळाचा तसेच शासनाचा मुख्य उद्देश साध्य होत नाही.

करिता महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेकरिता महामंडळाच्या ठेवीवर मिळणा-या व्याजाचे रक्कमेमधून प्रती वर्षी रू. २०.०० लाख निधी खर्च करण्याचा महामंडळाचा मानस असून सदर प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्ताव मान्य झाल्यास प्रती वर्षी १० वी, १२ वी, पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमांत ६०% किंवा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणा-या गुणवंत युवक/युवतींना पुढील शिक्षणाकरिता प्रोत्साहन मिळावे म्हणून गुणानुक्रमे व जेष्ठतेनुसार अनुक्रमे रू.५०००/-, रू. ७५००/- रू. १००००/- व रू. १२५००/- याप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येईल.

**विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत प्राप्त निधी व झालेला खर्च याबाबतचा तपशिल सन १९८५-८६ ते २०२३-२४ (३०-०६-२०२३) (रू. लाखात)**

| अ. क्र. | सन | तरतूद | प्राप्त निधी | लाभार्थी संख्या | खर्च रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | १९८५-८६ | -- | ४०.०० | १८३६ | ४०.०० |
| २ | १९८६-८७ | -- | १००.०० | २९०३ | ७६.२७ |
| ३ | १९८७-८८ | -- | ८८.०० | ३९४६ | १०६.६३ |
| ४ | १९८८-८९ | -- | ८८.०० | ३३६८ | ९२.९३ |
| ५ | १९८९-९० | -- | १४६.५२ | १६६३ | ९४.२३ |
| ६ | १९९०-९१ | -- | १५२.४८ | ३००६ | १६२.७८ |
| ७ | १९९१-९२ | -- | २००.०० | ४२३५ | २३२.०१ |
| ८ | १९९२-९३ | -- | १९८.११ | ४१७५ | २३८.१६ |
| ९ | १९९३-९४ | -- | २७८.३९ | ५०९१ | ३०९.४१ |
| १० | १९९४-९५ | -- | २३२.०२ | ५००५ | ३११.४८ |
| ११ | १९९५-९६ | -- | २४४.७० | ३५४३ | २८७.०० |
| १२ | १९९६-९७ | -- | २३९.७० | २३३७ | २७०.१६ |
| १३ | १९९७-९८ | -- | ३४५.४९ | ३३०४ | २९२.१० |
| १४ | १९९८-९९ | -- | ३३७.६७ | ३९८९ | ३७१.१६ |
| १५ | १९९९-०० | -- | ५०१.५४ | ४५७३ | ३११.२८ |
| १६ | २०००-०१ | -- | ७८२.५८ | २०२५ | ४९१.५५ |
| १७ | २००१-०२ | -- | ६२०.९६ | ३९२३ | ४७५.२५ |
| १८ | २००२-०३ | -- | ८९८.११ | ८२४७ | ९००.६६ |
| १९ | २००३-०४ | -- | ४९७.४१ | ९०६९ | ११०१.८२ |
| २० | २००४.०५ | १५००.०० | ९५८.६० | ७३२० | १०५५.७६ |
| २१ | २००५-०६ | १३००.०० | ४६२.९७ | ४४६७ | ६५२.३६ |
| २२ | २००६-०७ | १५००.०० | १३००.०० | ५७१५ | ७०७.६७ |
| २३ | २००७-०८ | १०००.०० | ३००.०० | ५०९२ | ६१८.०९ |
| २४ | २००८-०९ | १०००.०० | ९५०.०० | ३०१५ | ५५४.८६ |
| २५ | २००९-१० | १०००.०० | ६१६.७४ | ५४१९ | ६९६.०३ |
| २६ | २०१०-११ | १५००.०० | ९२५.०० | ५७२९ | १०१८.५५ |
| २७ | २०११-१२ | १५००.०० | ६००.०० | ३८०८ | ६२६.८९ |
| २८ | २०१२-१३ | १६००.०० | १६००.०० | ३४३२ | ५११.८५ |
| २९ | २०१३-१४ | १६००.०० | ७९५.०० | १९६६ | १२२६.४४ |
| ३० | २०१४-१५ | ३६४५.०० | १२००.०३ | १४०१ | १५९५.१० |
| ३१ | २०१५-१६ | ९७२४.८० | १०६१.२० | २९१९ | ३२०.२० |
| ३२ | २०१६-१७ | ३८००.०० | १३००.०० | १३६७ | २१९.२९ |
| ३३ | २०१७-१८ | ३८००.०० | ०.०० | १४९३ | २११.८० |
| ३४ | २०१८-१९ | ३८४५.५० | ०.०० | १५८७ | २०४.५५ |
| ३५ | २०१९-२० | १०४२८.०० | ०.०० | ९८२ | १४८.१७ |
| ३६ | २०२०-२१ | १०९११.०० | ०.०० | ५५६ | ११५.४७ |
| ३७ | २०२१-२२ | १०९११.०० | ०.०० | ४७६ | ६१.५० |
| ३८ | २०२२-२३ | ४५६७.७० | ०.०० | ३८८ | ५६.१० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३९ | २०२३-२४ | ०.०० | ०.०० | ३७ | ३४.९० |
| | एकूण | ७५१३३.०० | १८०६१.२२ | १३३४०७ | १६८००.४६ |

विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत **सन १९८५-८६ ते २०२३-२४ (३०-०६-२०२३)** एकूण रक्कम रू. **१८०६१.२२** लाख निधी प्राप्त **झाला** आहे. शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार एकूण प्राप्त निधीच्या १०% रक्कम प्रशिक्षण योजना , १०% रक्कम भू-विकास क्षेत्रासाठी (Infrastructure) व ३ % रक्कम मुल्यांकन व मुल्यमापनासाठी खर्च करणे अनिवार्य आहे. अनुदान योजनेअंतर्गत **१३३४०७** लाभार्थींना रू. **१६८००.४६** लाख , निधी खर्च झालेला आहे. ( सदर खर्चामध्ये बीजभांडवल योजनेतील अनुदान , एनएसएफडीसी योजनेतील अनुदान, प्रशिक्षण योजनेअंतर्गत रू.९६६.२४ लाख, इन्फ्रास्ट्रक्चरसाठी रू. २०३.८० लाख व मॉनिटरींग व इव्हल्युअेशन साठी रू. ६६.०३ लाख रक्कमेचा समावेश आहे.)

**सन २०२३-२४ (३०-०६-२०२३ अखेर)** चालू वित्तीय वर्षात विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य मध्ये अनुदान योजनेअंतर्गत ३७ लाभार्थींना रू. ३.७० लाख , बीजभांडवल योजनेतील ३.१० लाख, थेट कर्ज योजनेतील २८.१० असे असे एकूण ३४.९० लाख अनुदान निधीचे वाटप करण्यात आले आहे.

## बीजभांडवल योजनेचा प्राप्त निधी व त्याअंतर्गत झालेला खर्चाचा तपशिल सन १९८५-८६ ते २०२३-२४ (३०-०६-२०२३) (रू. लाखात)

| अ. क्र. | सन | तरतूद | प्राप्त निधी | लाभार्थी संख्या | खर्च रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1985-86 | -- | 15.00 | 164 | 4.26 |
| 2 | 1986-87 | -- | 15.00 | 120 | 3.06 |
| 3 | 1987-88 | -- | 15.00 | 186 | 5.37 |
| 4 | 1988.89 | -- | 4.42 | 226 | 6.48 |
| 5 | 1989-90 | -- | 11.70 | 147 | 5.20 |
| 6 | 1990-91 | -- | 33.95 | 110 | 6.96 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 1991-92 | -- | 0.00 | 152 | 12.50 |
| 8 | 1992-93 | -- | 16.00 | 115 | 9.81 |
| 9 | 1993-94 | -- | 22.00 | 219 | 17.15 |
| 10 | 1994-95 | -- | 23.65 | 327 | 27.22 |
| 11 | 1995-96 | -- | 100.00 | 432 | 23.42 |
| 12 | 1996-97 | -- | 192.26 | 1112 | 121.44 |
| 13 | 1997-98 | -- | 500.00 | 854 | 129.97 |
| 14 | 1998-99 | -- | 0.00 | 740 | 64.85 |
| 15 | 1999-00 | -- | 100.00 | 557 | 42.66 |
| 16 | 2000-01 | -- | 0.00 | 445 | 97.20 |
| 17 | 2001-02 | -- | 275.00 | 221 | 37.00 |
| 18 | 2002-03 | -- | 200.00 | 347 | 229.48 |
| 19 | 2003-04 | -- | 800.00 | 368 | 108.14 |
| 20 | 2004-05 | 1000.00 | 1211.00 | 579 | 224.30 |
| 21 | 2005-06 | 2000.00 | 2000.00 | 346 | 176.37 |
| 22 | 2006-07 | -- | 0.00 | 330 | 80.62 |
| 23 | 2007-08 | -- | 0.00 | 342 | 135.95 |
| ` | 2008-09 | 6000.00 | 6000.00 | 277 | 196.93 |
| 25 | 2009-10 | 2000.00 | 300.00 | 812 | 233.35 |
| 26 | 2010-11 | 1000.00 | 3200.00 | 619 | 711.81 |
| 27 | 2011-12 | 1500.00 | 6800.00 | 869 | 341.36 |
| 28 | 2012-13 | 7500.00 | 6000.00 | 822 | 603.32 |
| 29 | 2013-14 | 7500.00 | 6000.00 | 4955 | 6067.55 |
| 30 | 2014-15 | 7500.00 | 5625.00 | 18234 | 7771.88 |
| 31 | 2015-16 | 7500.00 | 0.00 | 278 | 460.54 |
| 32 | 2016-17 | 7500.00 | 0.00 | 755 | 844.35 |
| 33 | 2017-18 | 5000.00 | 0.00 | 621 | 400.74 |
| 34 | 2018-19 | 1000.00 | 0.00 | 457 | 255.60 |
| 35 | 2019-20 | 1000.00 | 0.00 | 250 | 131.84 |
| 36 | 2020-21 | 500.00 | 0.00 | 204 | 122.64 |
| 37 | 2021-22 | 500.00 | 8824.00 | 142 | 85.25 |
| 38 | 2022-23 | 10000.00 | 7000.00 | 173 | 102.96 |
| 39 | 2023-24 | 10000.00 | 0.00 | 31 | 17.73 |
| | **एकूण** | **79000.00** | **55283.98** | **37938** | **19917.26** |

| | | | |
|---|---|---|---|
| 36 | | शासनाचे मंजूरीनुसार कर्ज वसुलीपोटी एनएसएफडीसी, दिल्ली यांना भरलेली रक्कम | 13310.38 |
| 37 | | शासन निर्णय क्र. बैठक-2009/प्र.क्र.27/भाग-2/विघयो-2/01 जुलै, 2010 अन्वये कर्जमाफी धोरणांतर्गत राष्ट्रीय महामंडळाकडे भरणा केलेली रक्कम | 2270.00 |
| 38 | | राष्ट्रीयकृत बँकांकडील प्रलंबित कर्ज वसुलीपोटी राष्ट्रीयकृत बँकांना अदा केलेली रक्कम | 760.00 |
| 39 | | राज्य महामंडळाच्या बीजभांडवल योजनेची थकित रक्कम | 1534.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **एकूण** | 79000.00 | 55283.98 | 37938 | 37791.64 |

बीजभांडवल योजनेअंतर्गत **सन १९८५-८६ ते २०२३-२४ (३०-०६-२०२३)** पर्यंत महामंडळास एकूण रू. **५५२८३.९८** लाख निधी प्राप्त झाला असून त्याअंतर्गत एकूण **३७९३८** लाभार्थींना रक्कम रू. **३७७९१.६४** लाख निधीचे कर्ज वितरीत करण्यात आले आहे.

**सन** २०२३-२४ (३०-०६-२०२३ **अखेर** ) चालू वित्तीय वर्षात बीजभांडवल योजनेअंतर्गत ३१ लाभार्थींना रक्कम रू. १७.७३ लाख निधीचे वितरीत करण्यात आलेली आहे.

**शासन निर्णय क्र. एलएएस-२०२२/प्र.क्र.९४/महामंडळे/दिनांक ०४ नोव्हें. २०२२ अन्वये थेट कर्ज योजनेची कर्ज मर्यादा रू. २५०००/- वरून रू. १०००००/- वाढविण्यात आली आहे.**

थेट कर्ज योजना-२०२२-२३ (प्रकल्प मर्यादा रू. १.०० लाख) उद्दिष्ट, मंजूर व निधी वाटप याबाबतचा तपशिल (१६-०७-२०२३)

| अ. क्र. | जिल्हा | एकूण प्राप्त कर्ज प्रस्ताव | भौतिक उद्दिष्ट | भाग-भांडवल रक्कम रू. ०.८५ लाख | अनुदान रक्कम रू. ०.१० लाख | लाभार्थी सहभाग रू. ०.०५ लाख | एकूण प्रकल्प रक्कम | देण्यात आलेली मंजूरीपत्रे | NOC प्राप्त संख्या | पाठविण्यात आलेला निधी (MM) | पाठविण्यात आलेला निधी (SCA) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | ० | १० | ८.५० | १.०० | ०.५० | १० | ८ | ५ | ४.२५ | ०.५० |
| २ | मुंबई उपनगर | ० | २५ | २१.२५ | २.५० | १.२५ | २५ | १९ | ८ | ६.८० | ०.८० |
| ३ | ठाणे | ८ | ५० | ४२.५० | ५.०० | २.५० | ५० | ५० | ३० | २५.५० | ३.०० |
| ४ | रायगड | ० | १० | ८.५० | १.०० | ०.५० | १० | ८ | ० | ०.०० | ०.०० |
| ५ | पालघर | ० | ५ | ४.२५ | ०.५० | ०.२५ | ५ | ३ | २ | १.७० | ०.२० |
| | **एकूण** | **८** | **१००** | **८५.००** | **१०.००** | **५.००** | **१००** | **८८** | **४५** | **३८.२५** | **४.५०** |
| ६ | नाशिक | २७६ | ५० | ४२.५० | ५.०० | २.५० | ५० | ५० | ३५ | २९.७५ | ३.५० |
| ७ | धुळे | २२ | १५ | १२.७५ | १.५० | ०.७५ | १५ | १५ | ६ | ५.१० | ०.६० |
| ८ | जळगांव | १३ | १५ | १२.७५ | १.५० | ०.७५ | १५ | १५ | ७ | ५.९५ | ०.७० |
| ९ | अहमदनगर | २१० | ५० | ४२.५० | ५.०० | २.५० | ५० | ५० | २९ | २४.६५ | २.९० |
| १० | नंदुरबार | ५ | १० | ८.५० | १.०० | ०.५० | १० | १० | ० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **५२६** | **१४०** | **११९.००** | **१४.००** | **७.००** | **१४०** | **१४०** | **७७** | **६५.४५** | **७.७०** |
| ११ | पुणे | ३५० | ७० | ५९.५० | ७.०० | ३.५० | ७० | ७० | ३१ | २६.३५ | ३.१० |
| १२ | सातारा | १२० | ६५ | ५५.२५ | ६.५० | ३.२५ | ६५ | ६५ | ३९ | ३३.१५ | ३.९० |
| १३ | सांगली | ६७ | ४५ | ३८.२५ | ४.५० | २.२५ | ४५ | ४५ | १३ | ११.०५ | १.३० |
| १४ | कोल्हापूर | २८० | ६५ | ५५.२५ | ६.५० | ३.२५ | ६५ | ६५ | २४ | २०.४० | २.४० |
| १५ | सोलापूर | ३०० | ६५ | ५५.२५ | ६.५० | ३.२५ | ६५ | ६५ | ३५ | २९.७५ | ३.५० |
| | **एकूण** | **१११७** | **३१०** | **२६३.५०** | **३१.००** | **१५.५०** | **३१०** | **३१०** | **१४२** | **१२०.७०** | **१४.२०** |
| १६ | औरंगाबाद | १०७६ | ७० | ५९.५० | ७.०० | ३.५० | ७० | ७० | ४० | ३४.०० | ४.०० |
| १७ | जालना | ७७३ | ५० | ४२.५० | ५.०० | २.५० | ५० | ५० | ३४ | २८.९० | ३.४० |
| १८ | परभणी | १४८ | ४० | ३४.०० | ४.०० | २.०० | ४० | ४० | १० | ८.५० | १.०० |
| १८ | बीड | ० | ७० | ५९.५० | ७.०० | ३.५० | ७० | ७० | ४५ | ३८.२५ | ४.५० |
| | **एकूण** | **१९९७** | **२३०** | **१९५.५०** | **२३.००** | **११.५०** | **२३०** | **२३०** | **१२९** | **१०९.६५** | **१२.९०** |
| २० | लातूर | ४९६ | ७० | ५९.५० | ७.०० | ३.५० | ७० | ७० | ६२ | ५२.७० | ६.२० |
| २१ | उस्मानाबाद | २२० | ५० | ४२.५० | ५.०० | २.५० | ५० | ५० | १७ | १४.४५ | १.७० |
| २२ | नांदेड | ५५९ | ७० | ५९.५० | ७.०० | ३.५० | ७० | ७० | ४४ | ३७.४० | ४.४० |
| २३ | हिंगोली | ६० | २० | १७.०० | २.०० | १.०० | २० | २० | १६ | १३.६० | १.६० |
| | **एकूण** | **१३३५** | **२१०** | **१७८.५०** | **२१.००** | **१०.५०** | **२१०** | **२१०** | **१३९** | **११८.१५** | **१३.९०** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | नागपूर | ५४ | ३५ | २९.७५ | ३.५० | १.७५ | ३५ | ३५ | १ | ०.८५ | ०.१० |
| २५ | वर्धा | १५० | २० | १७.०० | २.०० | १.०० | २० | २० | ० | ०.०० | ०.०० |
| २६ | भंडारा | १० | १० | ८.५० | १.०० | ०.५० | १० | १० | ० | ०.०० | ०.०० |
| २७ | चंद्रपूर | १० | १० | ८.५० | १.०० | ०.५० | १० | ० | ० | ०.०० | ०.०० |
| २८ | गोंदिया | १२ | १० | ८.५० | १.०० | ०.५० | १० | १० | ७ | ५.९५ | ०.७० |
| २९ | गडचिरोली | ९ | ७ | ५.९५ | ०.७० | ०.३५ | ७ | ० | ० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **२४५** | **९२** | **७८.२०** | **९.२०** | **४.६०** | **९२** | **७५** | **८** | **६.८०** | **०.८०** |
| ३० | अमरावती | ० | ३५ | २९.७५ | ३.५० | १.७५ | ३५ | ३५ | ४ | ३.४० | ०.४० |
| ३१ | अकोला | ० | ३० | २५.५० | ३.०० | १.५० | ३० | ३० | २१ | १७.८५ | २.१० |
| ३२ | यवतमाळ | ० | २० | १७.०० | २.०० | १.०० | २० | २० | १० | ८.५० | १.०० |
| ३३ | वाशिम | ० | २० | १७.०० | २.०० | १.०० | २० | २० | ९ | ७.६५ | ०.९० |
| ३४ | बुलढाणा | ० | २० | १७.०० | २.०० | १.०० | २० | २० | ५ | ४.२५ | ०.५० |
| | **एकूण** | **०** | **१२५** | **१०६.२५** | **१२.५०** | **६.२५** | **१२५** | **१२५** | **४९** | **४१.६५** | **४.९०** |
| | G Total | **५२२८** | **१२०७** | **१०२५.९५** | **१२०.७०** | **६०.३५** | **१२०७** | **११७८** | **५८९** | **५००.६५** | **५८.९०** |

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून रू. १.०० लाख कर्ज मर्यादा असलेली थेट कर्ज योजना राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता १२०७ लाभार्थींचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यास अनुसरून ११७८ लाभार्थींना मंजूर आदेश निर्गमित करण्यात आले असून माहे जूलै, २०२३ अखेर ५८९ लाभार्थींचे कर्ज प्रकरणांतील रू. ५००.६५ लाख निधी प्रादेशिक कार्यालयांकडे पाठविण्यात आलेला आहे.

## एनएसएफडीसी योजनेअंतर्गत प्राप्त निधी व त्याअंतर्गत झालेला खर्चाचा तपशिल सन १९९३-९४ ते २०२३-२४ (३०-०६-२०२३) (रू. लाखात)

| अ.क्र. | सन | NSFDC यांचेकडून मंजूर लाभार्थी संख्या | NSFDC यांचेकडून मंजूर निधी | NSFDC यांचेकडून प्रत्यक्ष प्राप्त निधी | NSFDC योजनेअंतर्गत वाटप लाभार्थी संख्या | NSFDC योजनेअंतर्गत एकूण वाटप रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९३-९४ | १०० | २३.६० | २३.६० | १०० | २३.६० |
| २ | १९९४-९५ | १६ | ९.३० | ९.३० | १६ | ९.३० |
| ३ | १९९५-९६ | ३१६ | २४९.३४ | २४९.३४ | ३२० | २४९.३४ |
| ४ | १९९६-९७ | २२५ | १८९.६८ | १८९.६८ | २२५ | १८९.६८ |
| ५ | १९९७-९८ | २२१ | १९८.३३ | १९८.३३ | २२१ | १९८.३३ |
| ६ | १९९८-९९ | १० | २२.०० | २२.०० | १० | २२.०० |
| ७ | १९९९-०० | ५८ | १८५.४१ | १९३.२४ | ५८ | १८५.४१ |
| ८ | २०००-०१ | ६३१ | ५४२.९९ | ५४१.८३ | १७०३ | ५३६.२५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | २००१-०२ | १३९९ | ४८०.५० | ४३०.५० | ३९९ | ४१३.८८ |
| १० | २००२-०३ | २३५ | ३१२.४५ | २२३.२५ | १६८ | २१३.१० |
| ११ | २००३-०४ | ५६४ | ७१३.२५ | ९१.८० | ६३ | ९०.४० |
| १२ | २००४-०५ | ५६१ | ४०५.१० | १०३२.१० | १३१० | ११०२.६० |
| १३ | २००५-०६ | १२५० | ४८१.५० | २२५.०० | २५० | २५५.०० |
| १४ | २००६-०७ | १३८१ | ४१७.८४ | ५१७.०० | १०२३ | २२५.०० |
| १५ | २००७-०८ | ५४५ | ४४७.१० | ४४७.१० | ३२ | ६५.०० |
| १६ | २००८-०९ | २१४७ | ६३७.६३ | ४७३.१३ | १९५१ | ७२५.७१ |
| १७ | २००९-१० | १७९६ | ४४८.७० | ०.०० | २१७ | ९८.५६ |
| १८ | २०१०-११ | ३२२२ | २०७०.०९ | २४७५.३० | ३६२५ | २०९७.०६ |
| १९ | २०११-१२ | ३००० | २९०.०० | ०.०० | ५९९ | ४०९.४६ |
| २० | २०१२-१३ | ४२५२ | २२७८.०६ | १११५.९७ | ६८१ | ३९४.२३ |
| २१ | २०१३-१४ | ७७१० | ३२६८.०० | ३९५८.०० | ९५१४ | ३९८१.०१ |
| २२ | २०१४-१५ | ३००१ | १७२०.०० | २१००.०० | ३८८८ | १९९७.६२ |
| २३ | २०१५-१६ | ० | ०.०० | ०.०० | ६ | १६.४० |
| २४ | २०१६-१७ | १९८१ | ०.०० | ०.०० | ६५ | २५७.७० |
| २५ | २०१७-१८ | ० | ०.०० | ०.०० | ४ | २.२४ |
| २६ | २०१८-१९ | ० | ०.०० | ०.०० | १ | ०.६८ |
| २७ | २०१९-२० | ० | ०.०० | ०.०० | ० | ०.०० |
| २८ | २०२०-२१ | ० | ०.०० | ०.०० | ० | ०.०० |
| २९ | २०२१-२२ | ० | ०.०० | ०.०० | ० | ०.०० |
| ३० | २०२२-२३ | ० | ०.०० | ०.०० | ० | ०.०० |
| **एकूण** | | **३४६२१** | **१५३९०.८७** | **१४५१६.४७** | **२६४४९** | **१३७५९.५६** |

एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांची अधिकृत कोषवाहीनी म्हणून सन १९९३-९४ साली महामंडळास मान्यता मिळालेली आहे. **सन** १९९३-९४ **ते** २०२३-२४ **पर्यंत** विविध योजनांमध्ये एकूण रक्कम रू. **१५३९०.८७** लाख प्राप्त झाले असून त्यामध्ये एकूण **२६४४९** लाभार्थींना रक्कम रू. **१३७५९.५६** लाख रकमेचे कर्ज वितरण केलेले आहे. तसेच अवितरीत निधी रक्कम रू. **५५१.८४** लाख एनएसएफडीसीकडे परत केलेला आहे. असे एकूण रू. **१४३११.४०** लाख निधी खर्च झालेला आहे.

**योजना राबविणेबाबत आवश्यक कागदपत्रे व सेवा पुरविणारे अधिकारी**.

| **अ. क्र.** | **कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा** | **आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल** | **सेवा पुरविण्यास अधिकारी/ कर्मचारी** | **सेवा विहित कालावधीत न गेल्यास ज्याच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक** |
|---|---|---|---|---|
| १. | अनुदान योजना | सर्व अटीशर्तीची पूर्तता लाभधारकांने केल्यानंतर प्रस्ताव बँकेत गेल्यावर उद्दिष्टानुसार बँकेने प्रकरणांत मंजुरी दिल्यानंतर शासनाकडून निधी | बँक अधिकारी (सर्व राष्ट्रीयकृत बँकांचे) | जिल्हा व्यवस्थापक (प्रत्येक जिल्हाचे जिल्हा व्यवस्थापकाचे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मिळाल्यावर सदरचा निधी वेळीच बँकेत पाठविण्यात येतो. व बँकेमार्फत १ महिन्याच्या आतच लाभाथीर्स निधीचे वितरण केले जाते. | | दुरध्वनी क्र. स्वतंत्र जोडलेले आहे) |
| २. | प्रशिक्षण योजना | शासनमान्य प्रशिक्षण संस्थांनी जिल्हा कार्यालयात प्रस्ताव सादर केल्यांनतर, जि.का. मार्फत प्रस्ताव व संस्थेची खात्री करुन प्रस्ताव प्रा.का. कडे पाठविणेत येतो. प्रा.का.कडून संस्थेची खात्री/तपासणी करुन प्रस्ताव मुख्यालयास पाठविला जातो. विशेष केंद्रीय अर्थसहाय्याच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार दिलेल्या उद्दिष्टास अनुसरुन जिल्हानिहाय उद्दिष्ट देऊन प्रशिक्षण देण्याकरीता संस्थांना मान्यता दिली जाते. | जिल्हा व्यवस्थापक प्रत्येक जिल्ह्याचे | प्रादेशिक व्यवस्थापक प्रत्येक विभागाचे |
| ३. | बीजभांडवल योजना | सदर योजनेची प्रकल्प मर्यादा रु. ५०,०००/- ते रु. ७,००,०००/- पर्यंत आहे. त्यामध्ये रू. ५०,००१/- ते रु. ७,००,०००/- पर्यंतच्या मंजूर कर्ज प्रकरणांमध्ये रुपये १०,०००/- अनुदान व मंजूर त कर्ज राशीमध्ये लाभार्थीचा सहभाग ५%, महामंडळाचे कर्ज ४५% (रु. १०,०००/- अनुदानासह) व ५०% बँकेचे कर्ज असते. सर्व कागदपत्राची पूर्तता लाभधारकांने केल्यानंतर प्रस्ताव बँकेत पाठविण्यात येतो.<br>बँकेने मंजूरीचे आदेश जिल्हा कार्यालयाकडे दिल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार महामंडळाचे बीजभांडवल व अनुदानाची रक्कम बँकाकडे वेळीच पाठविल्यानंतर संबंधित लाभार्थीस बँकेमार्फत निधीचे वितरण वेळीच केले जाते. | बँक अधिकारी | जिल्हा व्यवस्थापक प्रत्येक जिल्ह्याचे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | शिष्यवृत्ती योजना इयत्ता १० वी, १२ वी व पदवी व पदवीत्तर परिक्षेत विशेष गुण प्राप्त झालेल्या विदयार्थ्यांस | मा. मुख्यमंत्री यांनी त्यांचे निधीतून महामंडळास रू. २० लाख दिलेले असून हा निधी कायमस्वरूपी बँकेत जमा करण्यात आलेला आहे. सदर जमा केलेल्या रक्कमेस प्रतिवर्षी मिळालेल्या व्याजातून महामंडळामार्फत शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. इयत्ता १० वी, १२ वी तसेच पदवी व पदवीत्तर परिक्षेत विशेष गुण मिळविणा-या विद्यार्थीना गुण मिळवून उत्तिर्ण झालेल्या विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. त्यामध्ये इयत्ता १० वी पासला | जिल्हा व्यवस्थापक | प्रादेशिक व्यवस्थापक तसेच मा.व्यवस्थापकीय संचालक, लो.अ.सा.वि.म.(म.), मुंबई |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | रू.१०००/-, १२ वी पासला रू. १५००/- व पदवी व पदवीत्तर परिक्षेत पास झालेल्या विद्यार्थ्यांना रू. २०००/- याप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.<br>सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी जिल्हा/प्रादेशिक कार्यालयात पास झाल्याचा पूरावा व इतर शैक्षणिक कागदपत्र जातीच्या दाखलासह, जास्तीत जास्त गुण प्राप्त विद्यार्थ्यांना अर्ज केल्यानंतर प्रत्येक जिल्ह्यातून शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येतो. सदरची शिष्यवृत्ती ही अर्ज केल्यापासून एका महिन्यात विद्यार्थ्यांचे नावाने धनादेश देण्यात येतो. | | |
| **ब) एनएसएफडीसी, दिल्ली यांचेकडून प्राप्त होणाऱ्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजना :-** | | | | |
| ५. | NSFDC<br>मुदत कर्ज | एनएसएफडीसी, दिल्ली यांचेकडून मुदत कर्ज प्राप्त होते. त्यानुसार महामंडळामार्फत पाठविलेल्या प्रकरणात मंजूरी प्राप्त झालेवर त्या मंजूरी पत्रातील अटीशर्तींची पुर्तता केल्यानंतर महामंडळाचे अनुदान योजना व बीजभांडवल निधी उपलब्ध झाल्यावर एनएसएफडीसीच्या प्रकरणात मंजूरी देण्यात येते व त्यामध्ये लाभार्थीने वैधानिक दस्तऐवजांची पुर्तता केल्यावरच महामंडळामार्फत निधीचे वितरण दोन-तीन महिन्यात केले जाते. | जिल्हा व्यवस्थापक | मा.व्यवस्थापकीय संचालक,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.), मुंबई ०२२/२५२७४०७२ २५२२०००२ |
| ६. | महिला समुध्दी योजना | एनएसएफडीसी योजने अंतर्गत महिला समृध्दी योजना सन २००४-०५ या वर्षापासून महामंडळामार्फत राबविण्यात येते. एनएसएफडीसीचे कर्ज रु.४०,०००/- व राज्य महामंडळाचे अनुदान रु.१०,०००/- असे एकूण रु.५०,०००/- च्या मर्यादेत सदर योजने अंतर्गत लाभ देता येतो. लाभार्थीने सर्व अटी शर्तीची पुर्तता केल्यानंतर प्रस्ताव जिल्हा कार्यालयाकडून प्रादेशिक कार्यालयात आल्यास तसेच NFSDC कडून निधी प्राप्त झाला असेल व मुख्यालयाकडून प्रादेशिक कार्यालयात प्राप्त झाल्यावर जिल्हा कार्यालयास निधी वाटप करण्यासाठी दिला जातो. जिल्हा कार्यालयात निधी प्राप्त नंतर वेळीच निधीचे वाटप करण्यात येते. | जिल्हा व्यवस्थापक | प्रादेशिक व्यवस्थापक तसेच मुख्य कार्यालय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | लघुत्रऋण वित्त योजना | एनएसएफडीसी योजने अंतर्गत लघुत्रऋण वित्त योजना सन २०००-०१ पासून राबविण्यात येत असून सदर योजने अंतर्गत एनएसएफडीसी चे मुदत कर्ज रु.४०,०००/- व राज्य महामंडळाचे अनुदान रु.१०,०००/- असे एकूण रु.५०,०००/- च्या मर्यादेत लघु ऋण वित्त योजनेचा लाभ देण्यासाठी लाभार्थींनी सर्व अटी शर्तीची पुर्तता केल्यानंतर प्रस्ताव जिल्हा कार्यालयाकडून प्रादेशिक कार्यालयात आल्यास तसेच NFSDC कडून निधी प्राप्त झाला असेल तर मुख्यालयाकडून प्रादेशिक कार्यालयात प्राप्त झाल्यावर जिल्हा कार्यालयास निधी वाटप करण्यासाठी दिला जातो. जिल्हा कार्यालयात निधी प्राप्त नंतर वेळीच निधीचे वाटप करण्यात येते. | जिल्हा व्यवस्थापक | प्रादेशिक व्यवस्थापक तसेच मुख्य कार्यालय |
| ८. | शैक्षणिक कर्ज योजना (एनएसएफडीसी) | सदरची योजना एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांनी सन २०१०-११ पासून सुरु केलेली आहे. अनुसूचित जातीतील मातंग समाज व त्यातील तत्सम १२ पोट जाती व शासनाने नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या मादगी आणि मादिगा जातींच्या विद्यार्थी-विद्यार्थींनी करिता देशात/परदेशात शिक्षण घेण्यासाठी कर्ज दिले जाते. सदर योजने अंतर्गत विद्यार्थ्यांने पुढील शिक्षणाकरिता संबंधीत कॉलेज/इस्टिट्यूट मध्ये प्रवेश घेतल्याचा पुरावा व इतर वैधानिक दस्तऐवजासह कार्यालयात अर्ज सादर केल्यानंतर सदरच्या अर्जाची छाननी संबंधीत जिल्हा व्यवस्थापकाकडून झाल्यानंतर प्रादेशिक कार्यालयामार्फत सदरचा अर्ज हा मुख्य कार्यालयास प्राप्त होतो. मुख्यालयाकडून प्रस्ताव परिपूर्ण असल्याची खात्री केल्यानंतर तो प्रस्ताव एनएसएफडीसी, दिल्ली यांना मंजूरीसाठी शिफारस केला जातो. एनएसएफडीसी, दिल्ली यांची मंजूरी मिळल्यानंतर व निधी प्राप्त झाल्यावर सदरचा निधी संबंधीत कॉलेज/इन्स्टिट्यूटला जिल्हा व्यवस्थापकांमार्फत वेळीच देण्यात येतो. | मुख्यालय/प्रादेशिक कार्यालय/ जिल्हा कार्यालय | प्रादेशिक व्यवस्थापक तथा मुख्य कार्यालय |

**अ) महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रता :-**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. अर्जदाराचे वय १८ वर्षे पुर्ण असावे व ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.
३. अर्जदार हा मातंग किंवा तत्सम जातीतील तसेच मादगी व मादिगा जातीचा असावा.
४. अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव/प्रशिक्षण घेतलेले असावे.
५. ग्रामीण व शहरी भागातील अर्जदाराच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ३,००,०००/-पेक्षा जास्त नसावे.
६. अर्जदाराने इतर कोणत्याही शासकीय योजनांचा किंवा महामंडळाच्या योजनांचा लाभ घेतलेला नसावा .
७. महामंडळाने वेळोवेळी घालून दिलेल्या शर्ती व अटी अर्जदारावर बंधनकारक राहतील.

**ब) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१. सक्षम अधिकारी यांनी दिलेला जातीचा दाखला.
२. सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या कुटूंबाच्या उत्पन्नाचा दाखला .
३. महामंडळाच्या योजनेचा फायदा घेऊ इच्छिणा-या अर्जदाराच्या बाबतीत नुकत्याच काढलेल्या पासपोर्ट साईज फोटोच्या २ प्रती.
४. अर्जदाराचे शैक्षणिक प्रमाणपत्र.
५. रेशन कार्डाच्या झेरॉक्स प्रती.
६. वाहन खरेदी करण्यासाठी वाहन चालविण्याचा परवाना. (Driving License)
७. ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा असेल त्या जागेच्या उपलब्धतेचा पुरावा.
८. व्यवसायासंबंधी तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभवानाचा दाखला.
९. व्यवसायासाठी खरेदी करावयाच्या मालाचे/साहित्याचे वाहनाचे कोटेशन.
१०. ग्रामसेवक/तलाठी यांचेकडून रहिवाशी प्रमाणपत्र. (दारिद्रय रेषेत नांव

असल्यास जिल्हा विकास यंत्रणा (D.R.D.A.) कडून लाभ न घेतल्याचा उल्लेख, नसल्यास दारिद्रय रेषेत नांव नसल्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे.)